स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव विज्ञान विद्याशाखेतील अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवीसाठी

सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधन शिर्षक

ग्रामीण भागातील आर्थिक दारिद्र्याचा चिकित्सक अभ्यास

विशेष संदर्भ : लातूर जिल्हा (2014-2024)

संशोधक विद्यार्थी

नानासाहेब श्रीरंग पटनुरे

संशोधन मार्गदर्शक

डॉ. सी. जे. देशमुख

एम.ए., नेट, पीएच. डी.

प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग

शिवाजी महाविद्यालय, उदगीर, जि.लातूर.

संशोधन केंद्र

शिवाजी महाविद्यालय, उदगीर, जि. लातूर.

सप्टेंबर, 2023

ग्रामीण भागातील आर्थिक दारिद्रयाचा चिकित्सक अभ्यास

विशेष संदर्भ: लातूर जिल्हा (2014-2024)

प्रस्तावना:

दारिद्रय, निर्धनता, गरिबी हे शब्द सामान्यत: एकाच अर्थाने वापरण्यात येतात. सर्वसाधारणपणे देशातील समाजाचा असा घटक की ज्याला आपल्या अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण व पिण्याचे शुध्द पाणी या मूलभूत सुविधा पुरेशा प्रमाणात उपभोगावयास मिळत नाहीत. अशा व्यक्तींना किंवा व्यक्तीसमुहास दारिद्रयावस्थेत समाविष्ट केले जाते. मानवी जीवनातील संक्रमण विकासाबरोबर उदभवलेली दारिद्रय ही एक आर्थिक व सामाजिक घटना आहे. दारिद्रय ही समस्या भारतापुरती मर्यादित नसून, तिचे स्वरुप जागतिक आहे. विकसित देशांपेक्षा विकसनशील देशांत दारिद्रयाची समस्या भीषण आहे.

ब्रिटीश राजवटीमध्ये भारतातील दारिद्रय कशा प्रकारे वाढत चालले आहे याचे वर्णन दादाभाई नौरोजी यांनी Poverty and Un-British Rule in India या ग्रंथात लेखन केले आहे. उत्पादनाच्या अभावाची समस्या हे दारिद्रयाचे प्रमुख कारण असुन, आर्थिक विकास हाच दारिद्रय निर्मुलनावर प्रभावी उपाय आहे. हे स्पष्ट केले. ब्रिटीशांनी केलेल्या आर्थिक लुटीमुळे भारतातील दारिद्रय वाढत आहे. याची जाणीव दादाभाई नौरोजींनी भारतीय जनतेला करुन दिली.

भारतात 1951 पासून आर्थिक विकासासाठी नियोजनांचा अवलंब करुन ही अनेक लोकांना आपल्या किमान आवश्यक गरजापूर्ण करता येत नाहीत. भारतातील

नियोजनाला मानवी चेहरा प्राप्त करुन करुन देण्याच्या दृष्टिने प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ज्ञ डॉ.अमर्त्य सेन यांनी दारिद्रय निर्मुलनाच्या कार्याक्रमावर भर देवून सामाजिक सशक्तता वाढविण्यास भर देण्याचे सुचविले आहे.

दारिद्रय ही एक आर्थिक व सामाजिक संकल्पना आहे. समाजातील ज्या व्यक्तीला किमान उपभोगाचा दर्जा अपुऱ्या उत्पन्नामुळे गाठता येत नाही त्या व्यक्तीस दरिद्री (गरीब) म्हटले जाते. भारत सरकारच्या नियोजन मंडळाने जुलै 1962 साली नियुक्त केलेल्या अभ्यासगटाने असे म्हटले आहे की, दरडोई मासिक 20 रुपये इतका उपभोग खर्च करु न शकणाऱ्या व्यक्तीचा समावेश दरिद्री (गरीब) म्हणून केला जावा. नियोजन मंडळाने ग्रामीण भागात दरडोई 2400 कॅलरीज व शहरी भागात किमान 2100 कॅलरीज उपभोग घेण्यासाठी आवश्यक ते उत्पन्न न मिळणे हा गरिबांचा मापदंड मानला आहे. दारिद्रयाची संकल्पना प्रत्येक समाजानुसार व देशानुसार भिन्न-भिन्न आहे. भारत व अमेरिकेतील दारिद्रयाच्या संकल्पनेत मुलभूप स्वरुपाचा फरक आढळतो.

भारतातील दारिद्रयाची सद्य:स्थिती व नियोजन काळात दारिद्रय निवारण्यासाठी शासनाने विविध योजना केलेल्या आहेत. देशातील विविध राज्यामध्ये दारिद्रयाचे प्रमाण हे कमी-अधिक स्वरुपात असल्याचे आढळून येते. महाराष्ट्रात मराठवाडा विभाग हा आर्थिक दृष्टया अधिकच मागासलेला असल्याने येथे दारिद्रयाची समस्या अधिक गंभीर दिसून येते. हे गांभीर्य लक्षात घेवून शासनाने आजपर्यंत दारिद्रय निर्मुलनासाठी अनेक विविध प्रकारच्या योजना ग्रामीण भागात राबविल्या जात आहेत. या योजनांचा फायदा किती लाभधारकांना झाला आहे का?

नाही हे जाणून घेण्यासाठी प्रस्तुत संशोधनातून दारिद्रयाचा अभ्यास करुन दारिद्रयाची समस्या ही किती गंभीर स्वरुपाची आहे. याची सत्यता पडताळून घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

संशोधन विषयाची निवड:

आज भारताला स्वातंत्र्य मिळून 76 वर्ष पूर्ण झाली असली तरीही 1951 पासून देशात पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून नियोजन बध्द विकासाला प्रारंभ झाला. शासनाने अनेक कल्याणकारी योजना राबविल्या या सर्वांचा परिणाम म्हणून देशात शैक्षणिक, वैज्ञानिक, शेती विषयक आणि औद्योगिक प्रगतीमध्ये सामाजिक व आर्थिक घटकात परिवर्तन होत गेले. या परिवर्तन प्रक्रियेत शासनाने राबविलेल्या दारिद्रय निर्मुलन योजनांची विविध राज्यामध्ये आपली भूमिका अधिक चांगल्या प्रकारे पार पाडल्यामुळे त्याचा सर्वाधिक प्रभाव गरीब, सामान्य, तळागाळातील मागासवर्गीय दारिद्रय रेषेखालील वर्गावर झालेला आहे. ग्रामीण भागातील दारिद्रयाचे निवारण पूर्णपणे झाले नसले तरीही त्याच्या मनात आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम केले आहे. म्हणून ग्रामीण भागातील जनता ही निरक्षर आहे. व त्यांच्यासाठी सरकारने अनेकविध योजना राबविल्या जात आहेत. या योजनांचा लाभ त्यांना घेता यावा म्हणून अध्ययनासाठी संशोधकाने 'ग्रामीण भागातील आर्थिक दारिद्रयाचा चिकित्सक अभ्यास विशेष संदर्भ: लातूर जिल्हा 2014-2024' हा विषय घेतला आहे. दारिद्रय दूर करण्यासाठी शासनाने दारिद्रय निर्मुलन करण्यासाठी योजना आखून सुध्दा ग्रामीण भागातील दारिद्रय अद्याप ही संपुष्टात आले नाही. अथवा योजनाच अपयशी ठरल्या का? याचा आढावा घेण्यासाठी

संशोधकाने संशोधनासाठी 'ग्रामीण भागातील आर्थिक दारिद्रयाचा चिकित्सक अभ्यास विशेष संदर्भ: लातूर जिल्हा 2014-2024' हा सदरील विषय निवडला आहे. प्रस्तुत संशोधनाच्या उद्दिष्टांना केंद्रबिंदू मानून ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनातील आर्थिक परिस्थितीचा वस्तुनिष्ठपणे अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये:

1. ग्रामीण भागातील दारिद्रय कमी करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजनांचा अभ्यास करणे.
2. ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेऊन त्यांच्या जीवनमानाचा अभ्यास करणे.
3. ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे वार्षिक उत्पन्नाचा अभ्यास करणे.
4. शासकीय योजनाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील दारिद्रयरेषेखालील कुटुंबाचे प्रमाण कमी झाले का नाही याचा अभ्यास करणे.
5. ग्रामीण दारिद्रय निर्मुलनासाठी विविध योजना राबविताना प्रशासनाची भूमिका अभ्यासणे.

संशोधनाची गृहितके:

1. ग्रामीण भागतील दारिद्रय रेषेखालील कुटुंबासाठी शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजनांचा लाभ ग्रामीण कुटुंबे घेतात.
2. ग्रामीण भागातील दारिद्रयरेषेखाली कुटुंब शासकीय योजनांचा लाभ घेतल्यामुळे

त्यांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारला आहे.

3. ग्रामीण भागातील दारिद्रयरेषेखालील कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नात वाढ झाली आहे.
4. शासकीय योजनांमुळे ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे दारिद्रयाचे प्रमाण कमी झाले आहे.
5. ग्रामीण दारिद्रय निर्मुलनात शासकीय योजना राबविताना प्रशासनाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरत आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:

प्रस्तुत संशोधनात 'ग्रामीण भागातील आर्थिक दारिद्रयाचा चिकित्सक अभ्यास विशेष संदर्भ: लातूर जिल्हा (2014-2024)' या विषयाचा अभ्यास करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती लातूर जिल्ह्यापुरतीच मर्यादित आहे. लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील आर्थिक स्थितीचा सखोल अभ्यास व्हावा. लातूर जिल्ह्यात एकूण 10 तालुके असून लातूर जिल्ह्यातील दारिद्रय रेषेखालील एकुण 200 कुटुंबाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधनाचा कालावधी:

प्रस्तुत संशोधन हे दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत संशोधनात 'ग्रामीण भागातील आर्थिक दारिद्रयाचा चिकित्सक अभ्यास विशेष संदर्भ: लातूर जिल्हा (2014-2024)' या निवडलेल्या विषयाच्या

उद्दिष्टांनुसार अभ्यास करण्यासाठी संशोधनाचे काम सखोल व सविस्तर व्हावे म्हणून संशोधनाचा कालावधी सन 2014-2024 हा दहा वर्षाचा कालावधी निवडला आहे.

संशोधन पध्दती:

प्रस्तुत संशोधन कार्यात विविध घटक महत्त्वाचे असतात. येथे सत्याचा शोध घेण्यासाठी वास्ताविकाता महत्त्वाची असते. याशिवाय संशोधन करणे शक्य नाही. कोणत्याही घटनेचे वास्तव व खरे स्वरुप मिळविण्यासाठी तथ्य आवश्यक असतात. संपूर्ण संशोधन हे तथ्यावर अवलंबून असते. त्यामुळे ही तथ्य शोधण्यासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोत अशा दोन्हीही प्रकारच्या स्त्रोतांचा आधार घेतला जाणार आहे.

1. प्राथमिक स्त्रोत:

जेव्हा संशोधनकर्ता हा अध्ययन क्षेत्रात जाऊन स्वत: ज्या साधनाद्वारे तथ्ये संकलीत करतो. त्यास प्राथमिक स्त्रोत असे म्हणतात. पी.व्ही.यंग यांनी निरीक्षण, मुलाखत, प्रश्नावली व अनुसूची इत्यादी प्राथमिक स्त्रोताची माध्यमे असल्याचे प्रकाशित केले आहे. या दृष्टिकोनातून संशोधकाने संशोधनाच्या प्राथमिक स्त्रोताच्या माध्यमातून माहिती व आकडेवारी गोळा केला जाणार आहे.

2. दुय्यम स्त्रोत:

जी सामग्री (तथ्य) स्वत: संशोधकांची नसून अन्य व्यक्तीची व संस्था यांच्याद्वारे संकलीत केली जाते. प्रकाशित व अप्रकाशित अशा स्वरुपाच्या असून

त्यात लिखित प्रलेखांचा अंतर्भाव होतो. त्या सामुग्रीला द्वितीय सामुग्री असे म्हणतात.

संशोधकाने प्रस्तुत संशोधनाच्या दुय्यम सामुग्रीसाठी विविध विद्यापीठात सादर करण्यात आलेले प्रकाशीत शोध प्रबंध, संदर्भ ग्रंथ, लेख, पुस्तके, शब्दकोष, जनगणना, विविध समित्यांचे अहवाल, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल, अर्थ व सांख्यिकी संचालनालय अहवाल महाराष्ट्र, महाराष्ट्र गॅझेट, साप्ताहिक, दैनिक वर्तमानपत्रे, पाक्षिके, मासिक, त्रैमासिक, षण्मासिक, नियतकालिके, वार्षिक अहवाल, भारताची आर्थिक सर्वेक्षण, राष्ट्रीय पातळीवर प्रकाशित होणारी मासिके तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांच्यातील कार्यालयीन अप्रकाशीत अहवाल, त्याच बरोबर इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमाद्वारे (दूरदर्शन, आकाशवाणी, इंटरनेट) प्रसारित होणाऱ्या माहितीच्या आधारे तथ्य संकलित करण्यात येणार आहेत.

नमुना निवड:

'ग्रामीण भागातील आर्थिक दारिद्र्याचा चिकित्सक अभ्यास विशेष संदर्भ: लातूर जिल्हा (2014-2024)' या विषयावरील संशोधनासाठी संभाव्यता नमुना निवड पध्दतीमधील साधा यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी लातूर जिल्ह्यात एकुण 10 तालुके असून. प्रत्येक तालुक्यातून 5 गावांची निवड करुन एका गावातून 4 दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची

निवड करण्यात येणार आहे. म्हणजेच एका तालुक्यातून 20 दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची निवड करण्यात येणार आहे. लातूर जिल्ह्यातील 10 तालुक्यातून दारिद्रय रेषेखालील 200 कुटुंबाची निवड करण्यात येणार आहे.

संशोधनाचे महत्त्व:

ग्रामीण भागातील **दारिद्रय** निर्मुलन हे आजच्या जगापुढे मोठे आव्हान आहे. भारतासारख्या विकसनशील देशासमोर तर या समस्येपेक्षा दुसरी कोणतीच गंभीर समस्या ही वर्तमान काळात असूच शकत नाही. जो पर्यंत **दारिद्रय निर्मुलन होत नाही. तो पर्यंत देशाचा विकास होऊ शकत नाही. महात्मा गांधीजीं असे मानत होते की, 'खरा भारत खेड्यात राहतो' आणि जोपर्यंत खेडे विकसित होणार नाहीत. तोपर्यंत देशाचा सर्वसमावेश विकास होणार नाही. खेड्यातील लोकांच्या एकंदरीत जीवनपध्दतीचा विचार जुलै 1936 रोजी 'हरिजन' या वृत्तात म.गांधीजींनी लिहिले होते की, खेड्याचा नाश हा भारताचा नाश आहे'. हे वाक्य आजच्या खेड्याकडे बघीतले म्हणजे लक्षात येते. भारतीय खेड्याचा सर्वांगिण विकास घडवून आणने ही म.गांधीजींची संकल्पना होती. कोणत्याही परिस्थितीत खेड्यातील प्रत्येक व्यक्तीची प्रगती व्हावी असा त्यांचा प्रामाणिक हेतू होता. भारत हा खेड्यांचा देश आहे. जवळपास 70-80 टक्के लोक शेती, शेतीपूरक व्यवसायावर आपला उदरनिर्वाह भागवितात. भारतात एकुण लोकसंख्येपैकी 83.3 करोड लोक ग्रामीण भागात राहतात. विकासाच्या या प्रक्रियेत देशातील सर्वात दुर्बल सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या ग्रामीण भागाचे स्थान काय? या ग्रामीण भागाचा**

विकासाचा वाटा उपभोगात येतो का? दारिद्रय निर्मलनाच्या बाबतीतील योजना ग्रामीण भागात कितपत यशस्वी झाल्या आहेत? अयशस्वी झाल्या असतील तर त्यातील अडथळे कोणते? प्रभावी घटक कोणकोणते? या योजनांची अंमलबजावणी करणारी प्रशासकीय यंत्रणा कोणती व कशा स्वरुपाची आहे? ग्रामीण विकासासाठी अनुकूल वातावरण निर्मिती करण्यात दारिद्रय निर्मुलन योजनांची भक्कम तयारी झाली आहे का? दारिद्रय निर्मुलन योजनामुळे कुटुंबाना आर्थिक चालना मिळाली आहे का? ग्रामीण भागातील लोकांत सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय जागरुकता निर्माण झाली काय? दारिद्रय दूर करण्याच्या योजनांमध्ये ग्रामीण कुटुंबाचा सहभाग किती लाभला व तो कसा लाभला? किंवा लाभलाच नाही? दारिद्रयाच्या योजनाबद्दल ग्रामीण भागातील कुटुंबाला योजनांची माहिती दिली गेली आहे का? ग्रामीण भागातील दारिद्रय दूर करण्यासाठी आणखी कोणत्या प्रकारच्या योजनांची निर्मिती केली काय? एकंदरीत या योजनांच्या अंमलबाजवणीतून ग्रामीण भागातील दारिद्रय दूर होण्यास मदत झाली का? या सर्व प्रश्नांच्या व समस्यांच्या तपासणीची आवश्यकता आज मोठ्या प्रमाणात गरज निर्माण झाल्यानेच ग्रामीण विकास करायचा असेल तर 'ग्रामीण भागातील आर्थिक दारिद्रयाचा चिकित्सक अभ्यास विशेष संदर्भ: लातूर जिल्हा (2014-2024)' हा विषय महत्त्वाचा वाटतो.

प्रकारणाची मांडणी:

प्रकरण. 1. प्रस्तावना

प्रकरण 2. संशोधन पध्दती व साहित्याचा आढावा

प्रकरण 3 लातूर जिल्ह्याची पार्श्वभूमी

प्रकरण 4 ग्रामीण दारिद्रय निर्मुलन योजनांचा अभ्यास

प्रकरण 5. संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रकरण 6 निष्कर्ष व शिफारशी

संदर्भसूची :

1. आगलावे प्रदिप. संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर. 2000.

2. बोधनकर व अनोली, सामाजिक संशोधन पध्दती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, 2003.

3. कऱ्हाडे बी.एम., शास्त्रीय संशोधन पध्दती, पिंपळापुरे पब्लिशर्स, नागपूर, तृतीय आवृत्ती-2011.

4. घाटोळे रा.ना., समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे व पध्दती, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर 2008.

5. सोमवंशी मनोजकुमार, ग्रामीण अर्थशास्त्र, अरुणा प्रकाशन, लातूर 2016.

6. बिरादार माधव, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, जुन 2012.

7. शिंदे के.एच., भारतीय अर्थव्यवथा, सेठ प्रकाशन, ठोणे, प्रथम आवृत्ती 2007.

8. भारती दिपक, लोकसंख्या अध्ययन, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती जुलै 2011.

9. टकले दिनकर , मराठवाड्यातील **दारिद्रया**ची समस्या, अर्थसंवाद, जानेवारी –मार्च, 2005.

10. मुरुगकर मिलिंद, शेतीचे जागतिकीकरण व दारिद्रय निर्मुलन, समाज प्रबोधन पत्रिका, जुलै-सप्टेंबर-2005.

11. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल, लातूर-2017.

संशोधक विद्यार्थी

नानासाहेब श्रीरंग पटनुरे

संशोधन मार्गदर्शक

डॉ.सी.जे. देशमुख

एम.ए.,नेट, पीएच. डी.

प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग

शिवाजी महाविद्यालय, उदगीर, जि.लातूर.